राज्यस्तरीय महावारसा शिखर समितीवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : पुवसं-२०२३ /ई-६५७९३३/प्र.क्र.२३७/सां.का.३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १२ ऑगस्ट, २०२६

वाचा:- १) शासन निर्णय पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग पुवसं २०२३/ प्र.क्र.२३७/ सां.का.३,दि.१६.०२.२०२४
२) संचालक,पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांचे पत्र क्र.तंत्र२०२६/ मं.प-महावारसा/ ९३४,दि.०४.०६.२०२६

प्रस्तावना:-

महाराष्ट्रातील राज्य संरक्षित स्मारके विशेषतः किल्ले हे जतन संवर्धनाच्या चांगल्या अवस्थेत आणणे व त्यावरील पर्यटन सुविधांचा विकास करून ही स्थळे लोकाभिमुख व जागतिक दर्जाची पर्यटन स्थळे व्हावीत, तसेच पर्यटन व सांस्कृतिक वारसा जतन या क्षेत्रात स्थानिक रोजगाराला चालना मिळावी याकरीता संदर्भाधीन क्र.१ अन्वये महावारसा समिती स्थापना करण्यात आली असून राज्यस्तरावर राज्यस्तरीय महावारसा शिखर समिती, महावारसा कार्यकारी समिती, प्रत्येक जिल्ह्यात एक जिल्हा महावारसा समिती व स्मारक स्तरावर स्मारक स्तरीय महावारसा समिती स्थापन करण्यात आली आहे. यामधील राज्यस्तरीय महावारसा शिखर समितीवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव संचालनालयाने संदर्भाधीन क्र.२ अन्वये शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे. त्यानुसार राज्यस्तरीय महावारसा शिखर समितीवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राज्यस्तरीय महावारसा शिखर समितीवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

अशासकीय सदस्यांची नावे व संबंधित क्षेत्र :-

अ.क्र.	अशासकीय सदस्याचे नाव	क्षेत्र
१.	आर.मृदुला माने	जतन व वारसा क्षेत्रातील तज्ञ
२.	डॉ.कुरूष दलाल	पुरातत्व विषयातील नामांकित व्यक्ती
३.	डॉ.मंजिरी कामत	इतिहास विषयातील नामांकित व्यक्ती
४.	श्री.केदार पाटणकर	सांस्कृतिक विषयातील नामांकित व्यक्ती

अशासकीय सदस्यांचा कार्यकाल व भत्ता :-

अशासकीय सदस्यांचा कार्यकाळ नियुक्ती पासून तीन वर्ष अथवा पुढील शासन आदेश होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत राहील. या सदस्यांना वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार अनुज्ञेय असलेला प्रवास भत्ता व दैनिक भत्ता लागू असेल.

०२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८१२१८०५०४२३४३ असा आहे.हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NANDA MARUTI RAUT

Digitally signed by NANDA MARUTI RAUT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Tourism and Cultural Affairs,
2.5.4.20=1983A6357BDEA5C5091136D73EC0B1D7D99AF67DF3CCA676C00FAD04572B4AA9, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=BAF9D9317025580944685E047B9C52D64C532684054F19E1F02C374B78E1773F, cn=NANDA MARUTI RAUT
Date: 2026.08.12 18:05:57 +05'30'

(नंदा राऊत)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३. उप सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. सर्व अशासकीय सदस्य (संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय मार्फत)
६. निवडनस्ती, सां.का. ३